(06 डिसेंबर 2022)

# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य रॅलीचे आयोजन







वडाळा येथील श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित, लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष नान्नज गावचे सरपंच माननिय श्री दादा टोणपे उपसरपंच माननिय श्री संभाजी धडे, ग्रामसेवक माननीय श्री कांबळे सर, ग्राम पंचायत सदस्य अनिल म्हमाने मेम्बर, दलित नेते तसेच नान्नज गावचे ग्रामस्थ यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. नान्नज गावचे सरपंच श्री दादा टोणपे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब हे एका जाती-धर्माचे नव्हते. ते संवेदनात्मक लोकशाही कट्टर *पुरस्कर्ते* होते . स्वातंत्र, समता आणि बंधुत्व या तत्वानी अविरतपणे जीवन जगण्याचा मार्ग दाखविला तसेच राजकीय, सामाजिक, वैचारिक, आर्थिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे . कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध गुरु असून त्यांच्या तत्वज्ञानाच्या कार्यामुळे व्यक्तिमत्व बहुआयामी होते . नान्नज गावचे ग्रामसेवक श्री कांबळे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की,

डॉ बाबासाहेब आंबेडकर भारतीय साठी एक आइडल आहेत . भारताची राज्यघटना एका व्यक्तीची, जातीची, धर्माची नाही तर ती सर्वसमावेशक आहे . कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री कांबळे सर यांनी पुरोगामी विचारवंत समजून घ्यायचे असतील तर पुरोगामी विचाराचे असले पाहिजे. तसेच उपभोकत्यानं विवेकशील *असावे* हे मत मांडले. कार्यकमाचे सूत्रसंचालन निदेशक श्री विटकर सर यांनी केले. आभार श्री संभाजी जाधव सर यांनी मानले या कार्यक्रमा साठी निदेशक श्री रणजीत गाडे सर, निदेशिका संध्याराणी शिंदे मॅडम, श्री राहुल गवळी सर, श्री सौरभ दहिटनकर सर, श्री लवटे सर आणि लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे 140 विद्यार्थी कार्यक्रम स्थळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महामानवाच्या प्रतिमेला पुष्पहाराने अलंकृत करून झाली. व कार्यक्रमाची *सांगता* नान्नज ते वडाला पाच किलोमीटर पायी रॅली काढून करण्यात आली